**University level Poster Compitition 2016 on gendar issues**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र
द्वारा आयोजित

# विद्यापीठस्तरीय पोस्टर स्पर्धा-२०१६

प्रथम पारितोषिक : रु. ३०००/- द्वितीय पारितोषिक : रु. २०००/- तृतीय पारितोषिक रु. १०००/-
२ उत्तेजनार्थ पारितोषिक : रु ५००/-

आज स्त्रिया विविध क्षेत्र पादाक्रांत करताना आपल्याला दिसून येत आहेत. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, संरक्षण, कला, माहिती-तंत्रज्ञान, व्यवस्थापन, अवकाश, गिर्यारोहण अशा सर्वच क्षेत्रात स्त्रिया पुढे जात आहेत. परंतु तरीदेखील समाजात स्त्रियांसाठी विषम परिस्थिती दिसून येते. शिक्षण, संपत्तीचा अधिकार, कौटुंबिक अधिकार, प्रतिनिधी म्हणून अधिकार, वैयक्तिक पातळीवरील अधिकार या बाबतीत स्त्रियांसाठी प्रतिकूल परिस्थिती आपल्याला सांख्यिकीय माहितीच्या आधारे आजही सिद्ध करता येते. स्त्रिया एकीकडे विकासाच्या परिघामध्ये येताना दिसून येत आहेत तर दूसरीकडे स्त्रियांविरोधी घडून येणारा हिंसाचार; त्यांचे समाजातील दुय्यम स्थान; पितृसत्तेच्या संरचनेत सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, रोजगारविषयक बाबतीत मागे पडलेल्या स्त्रिया; संस्कृतीच्या चौकटीत पारंपरिक दुष्टचक्रात अडकलेल्या स्त्रिया; वैधव्य, कुमारी माता, अत्याचारित, बलात्कारित, पीडित स्त्रिया; जात, वर्ग, लिंगभेदाचे सामाजिक वास्तव बळकट असल्याचे दिसून येते.

कला ही मानवी समुदायाच्या वाटचालीमध्ये महत्वाची असून कलेच्या माध्यमातून जगभरातल्या क्रांत्यांची पार्श्वभूमी निर्माण झाली. भारतीय प्रबोधनाच्या चळवळींमध्ये तसेच भारतातील स्त्रीमुक्तीच्या चळवळीला गतीमान करण्यामध्ये देखील कलेची भूमिका महत्वाची राहिलेली आहे. कलावंत हा वास्तवाचा वेध घेऊन जनतेच्या अगतिकतेला संघर्षाची चाकं देतो, मुक्तीचं तत्त्वज्ञान जनतेच्या हृदयात पेरुन त्यांना कृतीप्रवण करण हेच कलेचं प्रधान कार्य असतं आणि म्हणूनच स्त्रियांचे अनेकविध बहुअंगी प्रश्न विद्यार्थी, विद्यार्थीनींनी समजून घ्यावेत व आपले विचार व भावना चित्राच्या रुपात अभिव्यक्त कराव्यात असा मानस बाळगूण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्राच्या वतीने दि. ८ मार्च या जागतिक महिला दिनाच्या औचित्यावर विविध स्त्रीप्रश्नांवर आधारित विद्यापीठस्तरीय पोस्टर (भित्तीपत्रक) स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

समताधिष्ठित समाज निर्माण करण्यासाठी, स्त्री-पुरुष समता खऱ्या अर्थाने प्रस्थापित होण्यासाठी, विषमतेला कारणीभूत ठरणाऱ्या प्रश्नांचे उच्चाटन करण्यासाठी, सर्वांना समन्यायाने जगता यावे यासाठी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आपल्या कला-गुणांच्या माध्यमातून वरील बहुविध प्रश्न पोस्टरच्या (भित्तीपत्रकाच्या) सहाय्याने व्यक्त करावेत व स्त्रीमुक्तीच्या या उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रातर्फे करण्यात येत आहे.

## स्पर्धेचे विषय :

१. स्त्री शिक्षण (Women's Education)
२. स्त्रिया व हिंसाचार (Violence and Women)
३. स्त्रिया आणि संस्कृती (Women and Culture)
४. स्त्रिया आणि प्रसारमाध्यमे (Women and Media)
५. धर्म आणि स्त्रिया (Women and Religion)
६. शेती, श्रम, व्यवस्थापन आणि स्त्रिया (Women's with Farming,Manegment and Hard work)
७. स्त्रिया व कायदा ( Women and Law)
८. स्त्रिया व विकास ( Women and Development)
९. स्त्रिया व चळवळी (Women and Movement)
१०. पाणी आणि स्त्रिया ( Women and Water)
११. जात, वर्ग, पितृसत्ता आणि स्त्रिया (Caste, Class, Patriarchy and Women)

# डॉ. बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

# ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र


दुरध्वनी – ०२४०-२४०३३३१

संचालक – प्रा. निर्मला जाधव


दिनांक : २६ मार्च २०१६

## निकालपत्रक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रातर्फे शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या **विद्यापीठस्तरीय पोस्टर (भित्तीपत्रक) स्पर्धेत** खालील नमूद करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची प्रथम, द्वितीय, तृतीय, उत्तेजनार्थ (०३) पारितोषिकाकरीता निवड करण्यात आली आहे.

| अं.क्रं. | पारितोषिक | विद्यार्थ्याचे नाव | विभाग/महाविद्यालय |
|---|---|---|---|
| ०१ | प्रथम क्रमांक | प्रथम क्रमांकास अपेक्षित पोस्टर नाही | - |
| ०२ | द्वितीय क्रमांक | **पवार दिपीका हिम्मत** | इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभाग, डॉ. बा.आं.म.वि. |
| | | भोये सुनिल बाबुलाल | इंग्रजी विभाग, डॉ. बा.आं.म.वि. |
| ०३ | तृतीय क्रमांक | **बहिरे रश्मी जी.** | शिवाजी महाविद्यालय, कन्नड |
| ०४ | उत्तेजनार्थ १ | **शेवाळे चेतन साहेबराव** | ललित कला विभाग, डॉ. बा. आं. म. वि., औरंगाबाद |
| ०५ | उत्तेजनार्थ २ | अंबीलवाडे हर्षदा राजेंद्र | छत्रपती शाहु कॉलेज, लासुर स्टेशन, औरंगाबाद |
| ०६ | उत्तेजनार्थ ३ | सय्यद मुबीन जीमराली | ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र |

प्रा. निर्मला जाधव
संचालक
ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र

DIRECTOR
Tarabai Shinde Women's Studies Centre
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad

University level poster competion on gendar base issue



